# प्रेसनोट दि - ०३/१२/२०१८

पुणे शहर वाहतूक विभागाकडुन सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी कौशल्यपुर्ण कार्यपध्द्ती व संवाद कौशल्य या विषयावर श्रीमती मोहना मोरे, प्राध्यापक (पी.आय.बी.एम.कॉलेज आणि कन्सल्टन्ट, मॅनेजमेन्ट अॅण्ड कम्युनिकेशन स्कील फॉर एम.बी.ए.स्टुडंट अॅण्ड कार्पोरेट सेक्टर) यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन दिनांक : ०१/१२/२०१८ ते दिनांक ०३/१२/२०१८ दरम्यान सतत तीन दिवस दुपारी १.०० वा. ते ३.३० वा. पर्यंत पोलीस मुख्यालय, शि.नगर पुणे याठिकाणी करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमामध्ये प्राध्यापक श्रीमती मोहना मोरे यांनी मार्गदर्शनपर व्याख्यानात सांगितले की अधिकारी व कर्मचारी यांनी आपले कर्तव्य बजावित असतांना आपले मनाचे संतुलन योग्यप्रकारे ठेवून नेमुन दिलेले कर्तव्य १०० %. यशस्वीपणे बजावणे तसेच सकारात्मक विचार ठेऊन दिलेले कर्तव्य पार पडणे वर्तमानात जगून नेतृत्व गुण आपले अंगी बाळगुण, त्याचा यथायोग्य वापर करणेबाबत मार्गदर्शन केले. तसेच आपल्या भुतकाळात घडलेल्या वाईट घटना/प्रसंग वारंवार आठवून स्वतःमध्ये नकारात्मकता निर्माण करु नये.थोडक्यात असे की, स्वतःचे मन किती-जरी संकटे आली, किती-जरी आनंदाचे क्षण आले तरी स्थितप्रज्ञ/स्थिर ठेवावे. शेवटी मनाचे संतुलन ढळू न देता जर दैनंदिन कामकाज केले तर आलेल्या प्रसंगाशी तोंड देण्यास चांगल्या कल्पना / उपाययोजना सुचवुन मार्ग काढणेस वेळीच मदत होते व हातातील सर्व कामे यशस्वीपणे होतात. म्हणजेच स्वतः आनंदी सकारात्मक मनस्थितीत राहणे हे तुमच्यावरच अवलंबुन आहे.

सदर कार्यक्रमास पुणे शहर वाहतूक शाखेचे सर्व अधिकारी व कर्मचारी हजर होते. अधिकारी व कर्मचारी यांनी विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी योग्यप्रकारे उत्तरे देऊन शंकांचे निरसन केलेले आहे. या उपक्रमाचा पुणे शहर हे स्मार्ट सिटी बनत असल्यामुळे पोलीस यंत्रणा अधिक कार्यक्षम / कार्यकुशल बनण्यास मदत होईल व अधिकारी व कर्मचारी यांचे याबाबतचे ज्ञान अद्ययावत झाले. याचा निश्चितच भविष्यात वाहतूक शाखेस उपयोग होईल.

कार्यक्रमास एकूण ५१ अधि. व ७८१ कर्म. हजर होते.


पोलीसआयुक्तालय

